अमृतमहोत्सवी
सातारा, शनिवार
६ ऑक्टोबर २०१८
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# मी दिलेल्या उमेदवारांनाच कोरेगावकरांनी संधी दिली

## शरद पवार : रयतच्या कार्यक्रमात अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारण्याचीही घोषणा

**कोरेगाव : प्रतिनिधी**

कोरेगावात अत्याधुनिक क्रीडा संकूल उभारणार असल्याची घोषणा संस्थेचे अध्यक्ष खा. शरद पवार यांनी केली. दरम्यान, तसा कोरेगावकरांशी माझा जुना ऋणानुबंध आहे. आजवर माझा शब्द तालुक्याने पाळला असून, आम्ही दिलेल्या उमेदवारांना विधानसभेत प्रभावीपणे काम करण्याची संधी दिली असल्याचेही पवारांनी यावेळी आवर्जून सांगितले.

येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त विविध उपक्रमांचा शुभारंभ व मुख्य इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन खा. पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी चेअरमन डॉ. अनिल पाटील होते. व्यासपीठावर आ. शशिकांत शिंदे, आ. विश्वजित कदम, संस्थेचे व्हाईस चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे; कार्यकारिणी सदस्य रामशेठ ठाकूर, संजीव पाटील, सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, पंचायत समितीचे सभापती राजाभाऊ जगदाळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

खा. पवार पुढे म्हणाले, डी. पी. कॉलेजमध्ये ६८ टक्के विद्यार्थीनी असून महाविद्यालयाने सर्वच बाबतीत अग्रेसर राहून उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. भविष्यात या कॉलेजच्या विद्यार्थीनींनी सैन्य, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी होण्यासाठी प्रयत्न करावेत, त्यासाठी आवश्यक ते सहकार्य संस्थेतर्फे केले जाईल. मुलींना जर संधी दिली तर त्या क्रांती घडवू शकतात, याची वेगवेगळी उदाहरणे त्यांनी दिली.



**कोनशिला अनावरणप्रसंगी खा. शरद पवार, शेजारी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, आ. विश्वजित कदम, डॉ. अनिल पाटील, आ. शशिकांत शिंदे, अ‍ॅड. भगीरथ शिंदे, रामशेठ ठाकूर व मान्यवर.**

### आ. शशिकांत शिंदेंच्या निवासस्थानी नारळ पाणी

*खा. शरद पवार यांनी व्यस्त दौऱ्यातून आ. शशिकांत शिंदे यांच्या ल्हासुर्णे येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. डायनिंग टेबलवर फराळ आणि फळांची रेलचेल असली तरी त्यांनी नारळ पाणी घेणे पसंत केले. आ. शिंदे यांच्याबरोबर त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली. मुंबई बाजार समितीचे माजी सभापती बाळासाहेब सोळस्कर-पाटील, जयवंत भोसले, संजय झंवर, भास्कर कदम, अरुण माने, श्रीमंतभाऊ झांजुर्णे, श्रीमंतदादा झांजुर्णे, प्रतापराव कुमकले-निकम यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी खा. पवार यांचे स्वागत केले.*

आ. शशिकांत शिंदे, म्हणाले, कोरेगाव तालुका हा इतिहास घडविणारा तालुका म्हणून ओळखला जातो. या तालुक्याने खासदार शरद पवार यांच्या विचारांनाच स्थान दिले आहे. कोरेगावच्या कॉलेजला सहकार्य केले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

डॉ. अनिल पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. भीमराव मदने यांनी आभार मानले.